अति. महा.आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका.
ठराव क्र:-१/ ४९८
दिनांक :-१३/८/२०१५

अति.महा.आयुक्त (ज)कार्यालय
पुणे महानगरपालिका,पुणे-५,
जा. क्र :-अतिमआ/उआ(साप्र)/आस्था/ ३६२८
दिनांक :-१३/०८/२०१५

## :- आज्ञापत्र -:

विषय :- अभियांत्रिकी संवर्गातील ''उप अभियंता''(स्थापत्य) या पदावरील सेवकाच्या बदलीबाबत.

संदर्भ :- मा.अति.महा. आयुक्त (ज) ठ.क्र.१/ ४९८ दिनांक १३/०८/२०१५

पुणे मनपा प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील ''उप अभियंता''(स्थापत्य) या पदावरील सेवकांच्या खालील तपशिलानुसार त्यांच्या नावापुढे नमूद केल्याप्रमाणे प्रशासकीय कामकाजाचे सोयीसाठी या आज्ञापत्रकाच्या दिनांकापासून बदल्या करण्यात येत आहेत.

### ''उप अभियंता''(स्थापत्य)

| अ.क्र. | सेवकांची नावे | सध्याचे खाते | बदलीचे खाते | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. कुलकर्णी संजय भानुदास | घनकचरा व्यवस्थापन विभाग | अति.महा.आयुक्त (वि) कार्यालय | श्री. देसाई यांचे सेवानिवृत्तीने रिक्त जागी. |

१) वरील सर्व सेवकांना या आज्ञापत्रानुसार बदली विभागात रुजु होण्यासाठी दिनांक १४/ ८/२०१५ रोजी मध्यान्हपुर्व वेळेपासून कार्यमुक्त करण्यात आले आहे, असे समजण्यात यावे.

२) वरील सेवक बदली खात्यात रुजु झाल्याचे निवेदन संबंधीत खातेप्रमुख यांनी दिनांक १८/ ८/२०१५ रोजी मा.उप आयुक्त (सामान्य प्रशासन)कार्यालय आस्थापना विभाग,यांचेकडे सादर करावे.

३) मा.मुख्य सभा ठराव क्र. ५७७, दिनांक २१/१/२००४ अन्वये निश्चित करण्यांत आलेल्या अटीनुसार बदली करण्यात आलेल्या अधिकारी यांनी बदली रद्द करण्याबाबत कोणत्याही प्रकारचा राजकीय अथवा अन्य प्रकारे दबाव प्रशासनावर आणू नये. सदर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल तसेच त्यांचे विरुध्द योग्य ती शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

४) या आदेशा व्यतिरिक्त प्रत्यक्ष कामकाजाच्या खात्यामध्ये बदल केल्यास संबंधीतांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

५) उपरोक्त अधिकारी/सेवकास या आज्ञापत्राचे दिनांकापासून बदली खात्यात त्वरीत हजर होणेसाठी कार्यमुक्त करण्यात येत आहे. यासाठी स्वतंत्र कार्यमुक्ती आदेशाची आवश्यकता नाही.

तरी, संबंधित मा.खातेप्रमुख यांनी वरील बाबत पुढील जरुर ती तजविज करावी.

13/08

(राजेंद्र जगताप)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका.

प्रत/-
**सर्व संबंधित अधिकारी**
**मा.संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख,**
**पुणे महानगरपालिका.**
**यांजकडे पुढील तजविजीसाठी रवाना.....**

(मंगेश जोशी)
**उप आयुक्त**
**(सामान्य प्रशासन)**
पुणे महानगरपालिका.